महाराष्ट्र शासन
**महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
**२८ राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१.**
ई-मेल dy.commissionercdc@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०२०-२६३३०३७४

जाक्र/मबाविआ/बावि/का-5/बा.क.स/निप्र/2024-2025/ २०८७ दिनांक –२७।३।२०२५

मा. महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
जी.टी. हॉस्पीटल समोर ६ वा मजला,
नवीन मंत्रालय इमारत, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय :- महाराष्ट्र राज्यातील बाल कल्याण समिती अशासकीय अध्यक्ष/ सदस्यांची नियुक्ती करणेबाबत.**
**(महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हे एकुण -36)**

संदर्भ :-1 . शासन पत्र क्र.बाकस-2025/प्र.क्र.06/का-03 दिनांक 8 जानेवारी,202
2. शासन अधिसूचना महिला व बाल विकास विभाग दिनांक 02जुन,2022
3. शासन अधिसूचना महिला व बाल विकास विभाग दिनांक 16जुन,2022
4. शासन अधिसूचना महिला व बाल विकास विभाग दिनांक 06 एप्रिल, 2018
5.आयुक्तालयाचे पत्र क्र.839दिनांक 05/02/2025
6. शासन पत्र क्र. बाकस-२०२५ /प्र.क्र.०६/का-०३ दिनांक २१ मार्च, २०२५

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील प्रकरण ५ मधील कलम २७ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलाची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील नियम १५ (१) मध्ये बाल कल्याण समितीची स्थापना करण्याची तरतूद आहे, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ चा नियम ९० च्या अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या शिफारशी नुसार बाल कल्याण समितीची स्थापना करण्यात येते.

सदर तरतुदी नुसार बाल कल्याण समिती अध्यक्ष/ सदस्य या पदासाठी शासन अधिसूचना दिनांक ०२ जून, 2022 अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या सदस्यांची नियुक्ती लवकरच संपुष्टात येणार असल्याने संदर्भक्र. 6 चे शासन पत्रान्वये जाहिरात प्रसिध्द करणेबाबत कळविलेले आहे

त्यानुसार बाल कल्याण समिती अध्यक्ष / सदस्य पदांसाठी विहीत पात्रतेचे निकष पुर्ण करणा-या उमेदवारांकडुन नामांकने प्राप्त करुन घेणे बाबतची "जाहिरात" यापत्रासोबत जोडण्यात येत आहे

आपणास विनंती करण्यात येते की,सदरहु जाहिरात नमुद जिल्यातील सर्वाधिक खपाचे दोन वर्तमानपत्रातून मराठी प्रसिध्द करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| 1 | **कार्यालयाचे नाव** | महिला व बाल विकास आयुक्तालय, २८ राणीचा बाग, जुन्या सर्कट हाऊस जवळ, पुणे-१. |
| 2 | **जाहिरात प्रसिध्द करण्याचा दिनांक** | २८/03/2024 |
| 3 | **बील कोणाकडे पाठवावे** | महिला व बाल विकास आयुक्तालय, २८ राणीचा बाग, जुन्या सर्कट हाऊस जवळ, पुणे-१. |
| 4 | **जाहिरातीचे स्वरुप** | **महाराष्ट्र राज्यातील बाल कल्याण समिती अध्यक्ष/ सदस्यांची नियुक्ती करणेबाबत.** |
| 5 | **क्षेत्र** | महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हे एकुण -36 |
| 6 | **किती वर्तमानपत्रा मध्ये प्रसिध्द करण्यात यावी** | जिल्हा स्तरावरील एका अग्रगण्य वृत्तपत्रात. |
| 7 | **जाहिरात कितीवेळा प्रसिध्द करावयाची आहे** | एकवेळा |
| 8 | **नामांकन सादर करावयाचे ठिकाण** | संबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी |

**सोबत :- जाहिरातीचा मसुदा**

**आपली विश्वासु,**

**नयना अर्जुन गुंडे (भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य**

प्रत – मा. सचिव महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय , मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

**जाहिरात**
**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील प्रकरण ५ मधील कलम २७ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलाची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील नियम १५ (१) मध्ये बाल कल्याण समितीची स्थापना करण्याची तरतूद आहे, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ चा नियम ९० च्या अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या शिफारशी नुसार बाल कल्याण समितीची स्थापना करण्यात येते.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ च्या नियम ९१ च्या अधिन राहून महाराष्ट्र राज्यातील बाल कल्याण समिती मुंबई उपनगर-१ येथील ०१ अध्यक्ष व ०४ सदस्य पदे तसेच कोल्हापूर येथील ०२ सदस्य, धुळे, यवतमाळ, सोलापूर या जिल्ह्यातील प्रत्येकी ०१ सदस्य पदे अशी एकूण १० पदे वगळून उर्वरित सर्व बाल कल्याण समिती अध्यक्ष /सदस्य या पदाकरिता पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

वर नमुद केलेल्या पदांसाठी दिलेल्या अटीची पुर्तता करणा-या इच्छुक व्यक्तींनी विहित नमुन्यातील अर्ज वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि इतर तत्सम आवश्यक कागदपत्रांसह १५ दिवसांच्या आत आपले जिल्हयातील संबंधित जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांचे कार्यालयात सादर करावेत. तसेच सदरची सविस्तर जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in व आयुक्तालयाच्या http://wcdcommpune.com या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

नयना अर्जुन गुंडे (भा.प्र.से.)
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य

**जाहिरात**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील प्रकरण ५ मधील कलम २७ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ व **केंद्र शासनाची सुधारीत आदर्श नियमावली २०२२** मधील नियम १५ (१) मध्ये बाल कल्याण समितीची स्थापना करण्याची तरतूद आहे, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ व केंद्र शासनाची सुधारीत आदर्श नियमावली २०२२ मधील नियम ९० अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या शिफारशी नुसार बाल कल्याण समितीची स्थापना करण्यात येते.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारित अधिनियम २०२१ व **केंद्र शासनाची सुधारीत आदर्श नियमावली २०२२** मधील कलम २७ (४) व (४A) व नियम १५ अन्वये बाल कल्याण समिती अध्यक्ष / सदस्य यांच्या निवडीच्या निकषांमध्ये सुधारणा / दुरूस्ती करण्यात आली असून ती पुढीलप्रमाणे:

9. In section 27 of the principal Act
i) For sub-section (4), the following sub-sections shall be substituted namely:-

"(4) No person shall be appointed as a member of a committee unless he has a degree in child psychology or psychiatry or law or social work or sociology or human health or education or human development or special education for differently abled children and has been actively involved in health education or welfare activities pertaining to children for seven years or is a practicing professional with a degree in child psychology or psychiatry or law or social work or sociology or human health or education or human development or special education for differently abled children.

(4 A) No person shall be eligible for selection as a member of the Committee if he:-

VI) Has any past record of violation of human rights or child rights.
VII) Has been convicted of an offence involving moral turpitude and such conviction has not been reversed or has not been granted full pardon in respect of such offence.
VIII) Has been removed or dismissed from service of the Government of India or State Government or an undertaking or corporation owned or controlled by the Government of India or State Government.
IX) Has ever indulged in child abuse or employment of child labour or immoral act or any other violation of human rights or immoral act, or
X) Is part of management of a child care institution in a District.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारित अधिनियम, २०२१ आणि नियम ९१ च्या अधिन राहून खालील नमुद जिल्हयाच्या ठिकाणी बाल कल्याण समिती अध्यक्ष / सदस्य यांची नियुक्ती करण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र | जिल्हा | बाल कल्याण समिती अध्यक्ष | बाल कल्याण समिती सदस्य |
|---|---|---|---|
| 1 | मुंबई शहर -1 | ०१ | ०४ |
| | मुंबई शहर -2 | ०१ | ०४ |
| 2 | मुंबई उपनगर -2 | ०१ | ०४ |
| 3 | ठाणे | ०१ | ०४ |
| 4 | पालघर | ०१ | ०४ |
| 5 | रायगड | ०१ | ०४ |
| 6 | रत्नागिरी | ०१ | ०४ |
| 7 | सिंधूदुर्ग | ०१ | ०४ |
| 8 | पुणे 1- | ०१ | ०४ |
| | पुणे- 2 | ०१ | ०४ |
| 9 | सातारा | ०१ | ०४ |
| 10 | सांगली | ०१ | ०४ |
| 11 | सोलापूर | ०१ | ०३ |
| 12 | कोल्हापूर | ०० | ०३ |
| 13 | नाशिक | ०१ | ०४ |
| 14 | नंदुरबार | ०१ | ०४ |
| 15 | जळगांव | ०१ | ०४ |
| 16 | धुळे | ०१ | ०३ |
| 17 | अहमदनगर | ०१ | ०४ |
| 18 | भंडारा | ०१ | ०४ |
| 19 | चंद्रपूर | ०१ | ०४ |
| 20 | गडचिरोली | ०१ | ०४ |
| 21 | गोंदिया | ०१ | ०४ |
| 22 | नागपूर | ०१ | ०४ |
| 23 | वर्धा | ०१ | ०४ |
| 24 | अकोला | ०१ | ०४ |
| 25 | अमरावती | ०१ | ०४ |
| 26 | बुलडाणा | ०१ | ०४ |
| 27 | यवतमाळ | ०१ | ०३ |
| 28 | वाशिम | ०१ | ०४ |
| 29 | छ संभाजीनगर . | ०१ | ०४ |
| 30 | बीड | ०१ | ०४ |
| 31 | हिंगोली | ०१ | ०४ |
| 32 | जालना | ०१ | ०४ |
| 33 | लातुर | ०१ | ०४ |
| 34 | नांदेड | ०१ | ०४ |
| 35 | धाराशिव | ०१ | ०४ |
| 36 | परभणी | ०१ | ०४ |
| | एकुण पदे | ३७ | १४८ |

**उपरोक्त पदाबाबतचे पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत त्याचप्रमाणे सदरची व्यक्ती खालील क्षेत्रातील नामांकित, कार्यक्षम व अनुभवी असावी.**

१. समितीचे अध्यक्ष / सदस्यांचे वय अर्जाच्या दिनांकास ३५ वर्षांहून कमी व ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. सदस्य हा बालमानसशास्त्र किंवा मनोविकृती चिकित्सा किंवा विधी किंवा समाजकार्य किंवा समाजशास्त्र किंवा मानव आरोग्य किंवा शिक्षण किंवा मानव विकास किंवा दिव्यागांचे विशेष शिक्षक यामधील पदवी आणि बालकासबंधित आरोग्य, शिक्षण व कल्याण कार्याच्या क्षेत्रामधील किमान सात वर्षाचा सक्रीय सहभागाचा अनुभव असणारा किवा बालमानसशास्त्र किंवा मनोविकृती चिकित्सा किंवा विधी किंवा समाजकार्य किंवा समाजशास्त्र किंवा मानव आरोग्य किंवा शिक्षण किंवा मानव विकास किंवा दिव्यागांचे विशेष शिक्षक या विषयातील व्यवसायिक कार्य करणारा व्यक्ती असावा.
३. समितीचे अध्यक्ष / सदस्य कमाल दोन सत्रापर्यंतच्या, जे सलग नसतील, नियुक्तीस पात्र असतील.

**त्याचप्रमाणे उपरोक्त पदाबाबतचे अपात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत.**

खालील व्यक्ती समितीचा अध्यक्ष / सदस्य म्हणून निवडीसाठी पात्र नसेल जर ती :-

(i) अशी व्यक्ती जिच्याविरूध्द मानवी हक्कांचे किंवा बाल हक्कांचे उल्लंघन झाल्याची कोणतीही भूतकाळातील नोंद आहे.

(ii) नैतिक अध:पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आले आहे आणि अशा गुन्ह्याबद्दल पूर्ण माफी न मिळाल्याने अशा गुन्ह्याबदद्लची शिक्षा रदद् केली गेली नाही.

(iii) केंद्र शासन किंवा राज्य शासन यांच्या मालकीच्या किंवा नियंत्रित / अंगीकृत केलेल्या उपक्रम किंवा कॉपोरेशनच्या सेवेतून काढून टाकले किंवा बडतर्फ केले गेले आहे.

(iv) कधीही बाल शोषण किंवा बालमजुरी किंवा अनैतिक कृत्य किंवा मानवी हक्कांचे इतर कोणतेही उल्लंघन किंवा अनैतिक कृत्य केलेले आहे किंवा

(v) अशी व्यक्ती जी जिल्ह्यातील बालकाच्या काळजी घेणा-या संस्थाच्या व्यवस्थापनाचा भाग आहे.

(vi) परदेशी योगदान प्राप्त करणा-या संस्थेशी संबंधित व्यक्ती समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य होण्यास पात्र राहणार नाही.

(vii) कोणत्याही स्वयंसेवी संस्थेत किंवा इतर कोणत्याही संस्थेत कायदयाच्या अंमलबजावणीत काम करणारी कोणतीही व्यक्ती, समितीच्या अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून त्यांच्या कर्तव्याचे पालन करतांना हितसंबंधाची बाधा निर्माण होऊ शकेल असे कार्यकरत असेल तर अशी व्यक्ती समितीच्या अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पात्र राहणार नाही. तसेच,

(अ) कोणतेही कुटुंब सदस्य हा कोणत्याही स्वयंसेवी संस्थेचा सदस्य असेल.

(ब) जवळचा नातेवाईक हा कोणत्याही स्वयंसेवी संस्थेचा सदस्य असल्यास,

(क) व्यक्ती स्वयंसेवी संस्थाची प्रकरणे किंवा जिल्ह्यामध्ये बचाव व पुनर्वसन संबंधित काम करीत असल्यास,

(ड) बालकांची काळजी घेणाऱ्या संस्था चालविणाऱ्या व्यक्तीचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती किंवा कोणत्याही स्वयंसेवी संस्थेच्या मंडळाचा किंवा विश्वस्त मंडळाचा सदस्य असल्यास. नियुक्तीस पात्र राहणार नाही.

**<u>अटी व शर्ती</u>**

१. उपरोक्त पदाबाबत पात्रतेचे निकष मधील मुद्या क्र.१ व २ मध्ये नमूद केले नुसार वय, शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक आहे.
२. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ च्या नियम ९१ (६) प्रमाणे निवड समितीने निवडलेला सदस्य हा :

(एक) अधिनियम व नियमानुसार ज्यामुळे समितीच्या कामाकरिता संपूर्ण वेळ व पुरेसे लक्ष देऊ शकणार नाही असे एखादे पूर्ण-वेळ पद धारण करणारा नसावा

(दोन) अर्जदार हा समितीचा सदस्य असण्याच्या त्याच्या कार्यकाळात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही बालकांची काळजी घेणा-या संस्थेशी जोडलेला नसावा किंवा अशा संस्थेशी त्याचा अन्यप्रकारे हितसंबंध असता कामा नये.

(तीन) अर्जदार हा त्यांच्या कार्यकाळात तो कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयात कोणतेही पद धारण करणारा नसावा.

(चार) दिवाळखोर नसावा.

३. निवड प्रक्रियेपूर्वी सर्व अर्जदारानी पोलीस विभागाकडून प्राप्त केलेले चारित्र्य प्रमाणपत्र सादर केले पाहिजे. (नियम ९१ (५))

४. ज्या जिल्हयात सदस्य राहत असतील त्याच जिल्हयासाठीच अध्यक्ष / सदस्यांनी अर्ज करावयाचा आहे.

५. अर्जदारांना विहित नमुन्यातील हमीपत्रे / संमतीपत्रे देणे बंधनकारक राहील.

वर नमुद केलेल्या पदांसाठी दिलेल्या अटींची पुर्तता करणाऱ्या इच्छूक व्यक्तीनी आपले खालील विहित नमुन्यातील अर्ज वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि इतर तत्सम कागदपत्रासह जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत आपले जिल्हयातील संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयात दोन प्रतीत प्रस्ताव सादर करावेत. तसेच सदरची जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in व आयुक्तालयाच्या www.wcdcommpune.com या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

नयना अर्जुन गुंडे (भा.प्र.से.)
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य

**महाराष्ट्र राज्यातील जिल्हयांसाठी बाल कल्याण समिती अध्यक्ष / सदस्य या पदावर नियुक्ती करणेबाबत इच्छुक नामनिर्देशन करण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज.**

**प्रति,**

**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,**

**जिल्हा----**

1. अर्जदाराचे नाव
2. अर्जदाराची जन्मतारीख (वय)
3. अर्जदाराचा पत्ता, दुरध्वनी / मोबाईल नंबर ई-मेल आयडी.
4. अर्जदाराची शैक्षणिक अर्हत

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | वर्ष | विद्यापीठाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

5. अर्जदारास शिक्षण, आरोग्य व कल्याणकार्याच्या क्षेत्रातील बालकांसोबत काम करण्याचा किमान सात वर्षाचा अनुभव अहवाल अथवा बाल मानसशास्त्र, मनोविकृती चिकित्सा, समाजशास्त्र किंवा विधी यामधील पदवीसह व्यावसायीक कार्य करीत असलेचा अहवाल.

| अ.क्र. | अनुभवः शिक्षण, आरोग्य व कल्याणकारी क्षेत्रातील (बालकांशी निगडित कार्याचा कालावधी) | कार्यालयाचे नाव | यंत्रणेचे नाव | पदाचे नाव | थोडक्यात कार्य |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

६. अर्जदाराचा नोकरी / व्यवसायाबाबत तपशील कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक

७. अर्जदारास बाल विकास क्षेत्रातील अनुभव आहे का? असल्यास तपशिल.

८. अर्जदार व्यक्तीचे बाल कल्याण समितीवर काम करण्यासाठीचे हमीपत्र व संमतीपत्र.

९. अर्जदाराची इतर कोणत्याही समितीवर नियुक्ती झालो आहे काय? असल्यास त्याबाबतचा तपशील.

10. सोबतचे प्रतिज्ञापत्र

आपला/आपली विश्वासू

(स्वाक्षरी संपूर्ण नाव व पत्ता)

## अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र

मी श्री / श्रीमती -----------------------------------------------असे लिहून देते / देतो की, बाल कल्याण समिती जिल्हा ------- येथील सदस्य पदासाठी अर्ज करित असून सदर पदासाठी लागू असलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. त्यानुसार

1. मी वयाची अट पुर्ण करत आहे/नाही
2. मी शिक्षणाची अट पुर्ण करत आहे/नाही
3. मी अनुभव धारण करत आहे /नाही
4. मी पुर्णवेळ काम करण्यास तयार आहे/नाही
5. माझी बाल कल्याण समितीच्या कामकाजाशी हितसंबंध असणारी किंवा स्वत:ची बालकांची काळजी घेणारी संस्था आहे/ नाही
6. मी मानवी हक्क किंवा बाल हक्काचे उल्लंघन केलेले नाही तसेच मानवी हक्क किंवा बाल हक्क याबाबत भुतकाळातीलही नोंदी आहेत/नाहीत
7. माझेवर नैतिक अध:पतनाचा आरोप आहे /नाही व नैतिक अध:पतनाचा समावेश असलेल्या एखादया अपराधा बददल मला दोषी ठरवले गेले आहे/नाही आणि अशा प्रकारचे निर्दोषत्व परत करण्यात आले आहे /नाही किंवा सदर अपराधाबददल पुर्ण माफी दिली गेली आहे/नाही
8. केंद्र शासन, राज्य शासन व त्यांचे उपक्रम, निमसरकारी संस्था किंवा महामंडळ या सेवेतुन मला निलंबित अथवा काढून टाकलेले आहे/नाही
9. माझा बालकांचे शोषण, बाल मजुरी किंवा इतर कोणत्याही मानवी हक्काचे उल्लंघन किंवा अनैतिक कृत्यात कधीही सहभाग आहे/नाही
10. मी नियुक्ती कालावधीमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयात कोणतेही पद धारण करणार आहे/नाही
11. मला कोणत्याही न्यायालयाने दिवाळखोर घोषित केले आहे/ नाही
12. माझेवर फौजदारी प्रकरणाची नोंद आहे/ नाही तसेच मला चोवीस तासांहून अधिक काळ पोलीस अभिरक्षेत ठेवलेले आहे/नाही

उपरोक्त प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केलेली माहिती ही माझे माहिती व समजुती प्रमाणे खरी व बरोबर असुन त्यामध्ये कोणतीही माहि ती चुकीची अढळुन आल्यास मी फौजदारी प्रक्रियेस व शिक्षेस पात्र राहिल याची मला संपुर्ण जाणीव आहे सदर प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केलेल्या मजकुराचे सत्यते करि ता आज रोजी मी माझी स्वाक्षरी केली असे.

स्थळ -
दिनांक -

प्रतिज्ञापत्र करणा-याचे नाव व स्वाक्षरी